भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०

(सन १८६० चा अधिनियम क्रमांक २१)

[दिनांक १ जून १९९३ रोजीं यथाविद्यमान]

# The Societies Registration Act, 1860

**(Act No. 21 of 1860)**

[As in force on the 1st June 1993]

(महाराष्ट्र विशोधनांसहित)

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
[किंमत : रु. ३.५० पैसे]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ जून १९९३ रोजी यथाविद्यमान असलेला सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅक्ट, १८६० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग, बारा, अनुभाग १, खंड ५, अंक २, दिनांक ३० जून १९९४ यात पृष्ठ ४० ते ५१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ३० जून १९९४.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Societies Registration Act, 1860 as on the 1st June 1993 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 5, dated 30th June, 1994 on pages 40 to 51.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 caluse (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative test of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 30th June 1994.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०

## कलमांचा क्रम

कलमे

प्रास्ताविका

१क. निर्वचन.

१ख. सोसायटी निबंधक आणि सहायक निबंधक.

१. संस्थापन--समयलेख आणि नोंदणी याद्वारे बनवण्यात आलेल्या सोसायटया.

२. संस्थापन-समयलेखन.

३. नोंदणी आणि फी.

३क. अवांछनीय नावाच्या सोसायटयांची नोंदणी करण्यास मनाई.

४. व्यवस्थापक मंडळाची वार्षिक सूची दाखल करण्याबाबत.

४क. सोसायटीच्या नियामक मंडळाकडून माहिती व प्रतिवेदन मागविण्याचा निबंधकाचा अधिकार व त्यासंबंधीचे उपबंध.

५. सोसायटीची मालमत्ता कशाप्रकारे निहित असेल.

६. सोसायटयांनी किंवा त्यांच्या विरुद्ध दाखल करावयाचे दावे.

७. दावे अवसान न पावणे.

८. न्यायनिर्णयाची बजावणी सोसायटीविरुद्ध करणे.

९. उपविधी अन्वये लागू होणाऱ्या दंडाची वसुली.

१०. सदस्य हे तिऱ्हाईत व्यक्ती म्हणून दावा लावला जाण्यास पात्र.

जिंकलेल्या प्रतिवादीकडून न्यायनिर्णीत खर्चाची वसुली.

११. अपराधांबद्दल दोषी असणारे सदस्य तिऱ्हाईत व्यक्तीप्रमाणे शिक्षा होण्यास पात्र.

११क. कलम ४क चे उल्लंघन केल्याबद्दल दंड.

११ख. माहिती किंवा प्रतिवेदन अयोग्य रीतीने उघड केल्याबद्दल दंड.

११ग. अपराधांची दखल घेणे.

१२. आपल्या प्रयोजनामध्ये परिवर्तन करण्यास, त्यांची व्याप्ती वाढविण्यास किंवा त्यांचा संकोच करण्यास सोसायटयांना समर्थ करण्याबाबत.

१२क. नावातील बदलाची नोंदणी.

१२ख. नावातील बदलाचा परिणाम.

१२ग. सन १९४८ चा मुंबई अधिनियम ५३ हा अंमलात येण्यापूर्वी केलेल्या नावबदलांची नोंदणी.

१२घ. हिशेब ठेवणे आणि त्यांचे संतुलन व लेखापरीक्षा.

१२ङ. ताळेबंद तयार करणे व गैरनियम गोष्टी, इत्यादी कळवणे हे लेखापरीक्षकाचे कर्तव्य.

१३. सोसायटयांचे विसर्जन करणे आणि त्यांचा कारभार निस्तरणे यासाठी उपबंध.

संमती आवश्यक.

सरकारची संमती.

१४. विसर्जनानंतर कोणत्याही सदस्याला नफा न मिळणे.

संयुक्त भांडवल कंपन्यांना हा खंड लागू नाही.

कलमें

१५. 'सदस्य' याची व्याख्या.

निरर्ह सदस्य.

१६. 'नियामक मंडळ' याची व्याख्या.

१७. अधिनियमापूर्वी बनविण्यात आलेल्या सोसायटयांची नोंदणी.

१८. अशा सोसायटयांनी समयलेख इत्यादी निबंधक, संयुक्त भांडवल कंपन्या यांच्याकडे दाखल करणे.

१९. दस्तऐवजांचे निरीक्षण.

प्रमाणित प्रती.

२०. कोणकोणत्या सोसायटयांना हा अधिनियम लागू होतो.

२०क. 'विशेष सोसायटी' याची व्याख्या.

२०ख. विशेष सोसायटयांच्या बाबतीत अधिनियमात फेरबदल करण्याचा अधिकार.

२१. पूर्वी कच्छ, मध्यप्रदेश किंवा मुंबई राज्यातील सौराष्ट्र क्षेत्र यामध्ये प्रलंबित असलेल्या कार्यवाही आणि काढलेल्या किंवा केलेल्या संलेखातील 'कंपनी निबंधकांच्या' निर्देशांचा अन्वयार्थ.

२२. नियम.

शब्दसूची—

मराठी-इंग्रजी

इंग्रजी-मराठी

# सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०[१]

## (१८६० चा अधिनियम क्रमांक २१)[२]

[ १ जून १९९३ रोजी यथाविद्यमान ] [ २१ मे १८६० ]

**साहित्यिक, वैज्ञानिक आणि धर्मादाय सोसायट्यांच्या नोंदणीकरिता अधिनियम**

**प्रास्ताविका.** ज्याअर्थी, साहित्य, विज्ञान किंवा ललित कला यांच्या अभिवृद्धीकरता अथवा उपयुक्त ज्ञानाचा प्रसार, [३][राजकीय शिक्षणाचा प्रसार] यांकरता अथवा धर्मादाय प्रयोजनांकरता स्थापन केलेल्या सोसायट्यांची कायदेविषयक परिस्थिती सुधारण्याचा उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**निर्वचन.** [१][१क. या अधिनियमामध्ये विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, "निबंधक" या संज्ञेचा अर्थ, कलम १ख अन्वये नेमलेला 'सोसायटी निबंधक' असा आहे आणि तीत, सोसायटी निबंधकाचे अधिकार चालविण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी सदरहू कलमान्वये नेमलेल्या इतर अधिकाऱ्यांचा समावेश होतो.]

**सोसायटी निबंधक आणि सहायक निबंधक.** [१][१ख. (१) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एखाद्या व्यक्तीला 'सोसायटी निबंधक' म्हणून नेमू शकेल आणि असा निबंधक या अधिनियमाच्या उपबंधांद्वारे किंवा त्यांखाली त्यास प्रदान केलेले अधिकार चालवील आणि त्यास नेमून दिलेली कर्तव्ये व कामे पार पाडील, आणि राज्य शासन करील अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीनतेने, [२][सबंध [३][महाराष्ट्र राज्यात]] या अधिनियमाच्या प्रशासनावर देखरेख ठेवील आणि त्याच्या उपबंधांची अंमलबजावणी करील.

(२) राज्य शासन तशाच अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रांकरिता 'सोसायटी सहायक निबंधक' म्हणून व्यक्तींना नियुक्त करू शकेल आणि या अधिनियमाच्या सर्व किंवा सदरहू अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा उपबंधांखालील अधिकार चालविण्याचा आणि त्यांखालील कर्तव्ये व कामे पार पाडण्याचा अधिकार त्यांना देऊ शकेल.]

---

१. १८९७ चा अधिनियम १४, कलम २ व अनुसूचीद्वारे संक्षिप्त नाव देण्यात आले.

२. हा अधिनियम (पहिल्या चार कलमांचा अपवाद करून) 'साहित्यिक व वैज्ञानिक संस्था अधिनियम, १८५४' (व्हिक्टोरिया १७ व १८, प्रकरण ११२), कलम २० यावर व त्याच्या नंतरचे शब्द व पृष्ठे यांवर आधारित आहे.

'कायद्याच्या स्थानिक मर्यादा अधिनियम, १८७४' (१८७४ चा १५), कलम ३ द्वारे हा अधिनियम अनुसूचित जिल्हे वगळून संपूर्ण भारतात अंमलात आला असल्याचे घोषित केले आहे.

१९४९ चा अधिनियम ५९ याद्वारे हा अधिनियम नवीन प्रांत आणि विलीन करण्यात आलेली संस्थाने यांना लागू केला.

३. १९२७ चा अधिनियम २२, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

१. १९५६ चा मुंबई अधिनियम ११, कलम २ द्वारे १क व १ख ही कलमे समाविष्ट केली.

२. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम २(ड) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. महाराष्ट्र अनुकूलन आदेश, १९६० द्वारे "मुंबई राज्य" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

**संस्थापन समयलेख आणि नोंदणी याद्वारे बनविण्यात आलेल्या सोसायटया.**

१. कोणत्याही साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनाकरता, किंवा या अधिनियमाच्या कलम २० मध्ये वर्णिलेल्या अशा कोणत्याही प्रयोजनाकरता एकत्रित झालेल्या कोणत्याही सात किंवा त्याहून अधिक व्यक्ती एका संस्थापन-समयलेखावर आपल्या नावांच्या स्वाक्षऱ्या करून आणि [1] * * * असा समयलेख निबंधक, संयुक्त भांडवल कंपनी यांच्याकडे दाखल करून या अधिनियमान्वये सर्व मिळून एक सोसायटी बनवू शकतील.

**संस्थान समयलेख आणि नोंदणी याद्वारे बनविण्यात आलेल्या सोसायटया.**

१. कोणत्याही साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनाकरता, किंवा या अधिनियमाच्या कलम २० मध्ये वर्णिलेल्या अशा कोणत्याही प्रयोजनाकरता एकत्रित झालेल्या कोणत्याही सात किंवा त्याहून अधिक व्यक्ती एका संस्थापन-समयलेखावर आपल्या नावांच्या स्वाक्षऱ्या करून, आणि असा समयलेख [1][निबंधकाकडे] दाखल करून या अधिनियमान्वये सर्व मिळून एक सोसायटी बनवू शकतील.

**संस्थापन-समयलेख.**

२. संस्थापन-समयलेखामध्ये पुढील गोष्टी असतील, त्या म्हणजे :—

सोसायटीचे नाव ;

सोसायटीची उद्दिष्टे ;

नियामक, परिषद, संचालक, समिती अथवा सोसायटीच्या नियमांद्वारे ज्याच्याकडे तिच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आलेले आहे असे अन्य नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय.

सोसायटीचे नियम व विनियम यांची यथातथ्य प्रत म्हणून नियामक मंडळाच्या किमान तीन सदस्यांनी प्रमाणित केलेली एक प्रत संस्थापन-समयलेखाबरोबरच दाखल करावी लागेल.

**नोंदणी आणि फी.**

३. असा समयलेख आणि प्रमाणित प्रत दाखल करण्यात आल्यानंतर निबंधक, या अधिनियमान्वये त्या सोसायटीची नोंदणी करण्यात आली असल्याचे स्वतःच्या स्वाक्षरीने प्रमाणित करील. अशा प्रत्येक नोंदणीबद्दल निबंधकाकडे पन्नास रुपये फी किंवा [2][राज्य शासन] वेळोवेळी निर्दिष्ट करील त्याप्रमाणे त्याहून कमी फी भरावी लागेल ; आणि भरण्यात आलेल्या अशा सर्व फीचा हिशेब [3][राज्य शासनाकडे] द्यावा लागेल.

**नोंदणी आणि फी.**

३. असा समयलेख आणि प्रमाणित प्रत दाखल करण्यात आल्यानंतर [2][कलम ३क च्या उपबंधांच्या अधीनतेने,] निबंधक, या अधिनियमान्वये त्या सोसायटीची नोंदणी करण्यात आली असल्याचे स्वतःच्या स्वाक्षरीने प्रमाणित करील. अशा प्रत्येक नोंदणीबद्दल निबंधकाकडे पन्नास रुपये फी किंवा राज्य शासन वेळोवेळी निर्दिष्ट करील त्याप्रमाणे त्याहून कमी फी भरावी लागेल ; आणि भरण्यात आलेल्या अशा सर्व फीचा हिशेब राज्य शासनाकडे द्यावा लागेल :

[3][परंतु, ज्या क्षेत्रात 'मध्य प्रांत व वऱ्हाड विद्यामंदिर अधिनियम, १९३९' (१९४० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम तीन) अंमलात असेल अशा कोणत्याही क्षेत्रात एखादी शैक्षणिक संस्था, चालवण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या सोसायटीच्या नोंदणीसाठी, जर तिची उद्दिष्टे त्या अधिनियमाच्या १ ल्या भागान्वये स्थापन केलेल्या विद्यामंदिराच्या उद्दिष्टांसारखीच असतील तर, अशी कोणतीही फी द्यावी लागणार नाही.]

**अनिष्ट नावाच्या संस्थांची नोंदणी करण्यास प्रतिबंध.**

[4][३क. जे नाव इतर कोणत्याही विद्यमान सोसायटीची ज्या नावाने पूर्वी नोंदणी करण्यात आली असेल त्या नावासारखेच असल्यामुळे, अथवा निबंधकाच्या मते, लोकांची किंवा दोन्ही सोसायट्यांपैकी कोणत्याही सोसायटीच्या सदस्यांची फसगत होऊ शकेल इतके त्या सोसायटीच्या नावाशी साम्य

---

१. १८७४ चा अधिनियम १६, कलम १ आणि अनुसूची एक याद्वारे "१८५७ चा अधिनियम १९ याखाली" हा मजकूर निरसित केला. आता पहा 'कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १).'

२. अनुक्रमे विधि अनुकूलन आदेश, १९३७ व विधि अनुकूलन आदेश, १९५० यांद्वारे 'गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला.

३. किता—'शासन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल केला.

१. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम २(ड) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

३. किता-कलम ३ द्वारे या परंतुकाची भर घातली.

४. किता—कलम ३ द्वारे कलम ३क समाविष्ट केले.

असल्यामुळे, अथवा ज्या नावावरून, संबंधित शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय, उक्त शासनाचा आश्रय असल्याचे किंवा उक्त शासनाने अगर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने प्रस्थापित केलेल्या कोणत्याही सोसायटीशी संबंध असल्याचे सूचित होत असल्यामुळे किंवा सूचित होण्याचा संभव असल्यामुळे निबंधकाच्या मते अवांछनीय असेल किंवा यासंबंधात करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, जे नाव अवांछनीय असल्याचे निबंधक मानील अशा नावाने कोणत्याही सोसायटीची नोंदणी करता येणार नाही.]

४. सोसायटीच्या नियमांनुसार ज्या दिनांकाला सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येते त्या दिनांकानंतर चौदाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी, अथवा जर नियमांमध्ये वार्षिक सवसाधारण सभेसाठी उपबंध करण्यात आलेला नसेल तर, जानेवारी महिन्यात, याप्रमाणे दरवर्षी एकदा नियामक, परिषद, संचालक, समिती किंवा त्या त्या वेळी ज्याच्याकडे सोसायटीच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपवण्यात आलेले असेल असे अन्य नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय यांची एक सूची 'निबंधक, संयुक्त भांडवल कंपनी' यांच्याकडे दाखल करावी लागेल.

**व्यवस्थापक मंडळाची वार्षिक सूची दाखल करण्याबाबत.**

४. सोसायटीच्या नियमांनुसार ज्या दिनांकाला सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येते त्या दिनांकानंतर चौदाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी, अथवा जर नियमांमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपबंध करण्यात आलेला नसेल तर, जानेवारी महिन्यात, याप्रमाणे दरवर्षी एकदा नियामक, परिषद, संचालक, समिती किंवा त्या त्या वेळी ज्याच्याकडे सोसायटीच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपवण्यात आलेले असेल असे अन्य नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय यांची एक सूची [1][निबंधकाकडे] दाखल करावी लागेल.

**सोसायटीच्या नियामक मंडळाकडून माहिती व प्रतिवेदन मागविण्याचा निबंधकांचा अधिकार व त्यासंबंधीचे उपबंध.**

[2][४क. (१) या अधिनियमान्वये नोंदण्यात आलेल्या कोणत्याही सोसायटीच्या कारभाराचे व्यवस्थापन ज्याच्याकडे सोपविण्यात आले असेल त्या नियामक मंडळावर, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने निबंधकास नोटीस बजावता येईल किंवा बजावण्याची व्यवस्था करता येईल व उक्त नोटीशीद्वारे, सोसायटीने कामावर ठेवलेले इसम, त्यांच्या सेवा-शर्ती (त्यांचे परिलाभ, कोणतीही अंशदाने, सवलती किंवा कर्मचाऱ्यांकरिता तरतूद करण्यात आलेले इतर लाभ व सोयी धरून), व तत्संबंधित बाबी यांविषयी नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी माहिती किंवा प्रतिवेदने सादर करण्याबद्दल सोसायटीला फर्माविता येईल.

(२) कोणत्या नमुन्यात अशी माहिती किंवा प्रतिवेदने पाठविण्यात आली पाहिजेत, त्यांमध्ये कोणता तपशील असावयास पाहिजे व किती कालांतरागणिक (कोणतीही असल्यास) अशी माहिती किंवा प्रतिवेदने पाठवावी लागतील या गोष्टी नियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली नोटीस टपालाद्वारे बजावता येईल.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ गोळा केलेली कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन हे, ज्या सोसायटीच्या संबंधात सदरहू माहिती देण्यात किंवा प्रतिवेदन तयार करण्यात आले असेल त्या सोसायटीच्या आगाऊ लेखी संमतीशिवाय, त्यामधील

---

१. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम २(ड) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ४ द्वारे कलम ४क समाविष्ट केले.

कोणताही तपशील विशिष्ट सोसायटीच्या संबंधातील तपशील आहे हे ओळखणे ज्यामुळे शक्य होईल अशा रीतीने प्रसिद्ध करता येणार नाही.

(५) कलम ११क खालील किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखालील खटल्याच्या प्रयोजनाशिवाय एरव्ही निबंधक किंवा या बाबतीत त्याने रीतसर विनिर्दिष्ट केला असेल असा कोणताही इसम याच्याखेरीज कोणत्याही इसमास, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन पाहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(६) या कलमास अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, निबंधकाविरुद्ध किंवा निबंधकाच्या प्राधिकारान्वये काम करणाऱ्या कोणत्याही इसमाविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.]

सोसायटीची मालमत्ता कशाप्रकारे निहित असेल.

५. या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेल्या सोसायटीच्या मालकीची जंगम आणि स्थावर मालमत्ता जर विश्वस्तांकडे निहित नसेल तर, ती त्या त्या वेळी अशा सोसायटीच्या नियामक मंडळाकडे निहित असल्याचे मानण्यात येईल, आणि दिवाणी व फौजदारी अशा सर्व प्रकारच्या कार्यवाहींमध्ये ती अशा सोसायटीच्या नियामक मंडळाच्या योग्य नामाभिधानानिशी त्यांची मालमत्ता म्हणून वर्णिली जाऊ शकेल.

सोसायट्यांनी किंवा त्यांच्याविरुद्ध दाखल करावयाचे दावे.

६. या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक सोसायटीचे नियम व विनियम यांद्वारे निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे अध्यक्ष, कार्याध्यक्ष किंवा मुख्य कार्यवाह किंवा विश्वस्त यांच्या नावाने आणि असे निश्चित केले नसल्यास, नियामक मंडळाकडून त्या प्रसंगापुरती जी नियुक्त करण्यात येईल अशा व्यक्तीच्या नावाने त्या सोसायटीला दावा लावता येईल किंवा त्या सोसायटीच्याविरुद्ध दावा लावता येईल :

परंतु, सोसायटीविरुद्ध मागणीहक्क असलेल्या किंवा तिच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, नियामक मंडळाकडे अर्ज आल्यानंतर अन्य कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती प्रतिवादी म्हणून नामनियुक्त करण्यात आलेली नसेल तर, सोसायटीचा अध्यक्ष किंवा कार्याध्यक्ष किंवा मुख्य कार्यवाह किंवा विश्वस्त यांच्याविरुद्ध दावा दाखल करणे कायदेशीर ठरेल.

दावे अवसान न पावणे.

७. कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा किंवा कोणतीही कार्यवाही चालू असताना, असा दावा किंवा अशी कार्यवाही जिच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली असेल किंवा चालू ठेवण्यात आलेली असेल ती व्यक्ती मरण पावल्यामुळे अथवा ज्या पदाच्या नावाने त्या व्यक्तीने दावा लावलेला असेल किंवा तिच्याविरुद्ध दावा लावलेला असेल त्या पदावर ती राहण्याचे बंद झाल्यामुळे असा दावा किंवा कार्यवाही अवसान पावणार नाही किंवा बंद पडणार नाही, तर तो दावा किंवा ती कार्यवाही त्या व्यक्तीच्या उत्तराधिकाऱ्याच्या नावाने किंवा त्याच्याविरुद्ध चालू ठेवण्यात येईल.

न्यायनिर्णयाची बजावणी सोसायटीविरुद्ध करणे.

८. सोसायटीच्यावतीने नामित करण्यात आलेल्या व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्याविरुद्ध एखादी न्यायनिर्णीत रक्कम वसूल करावयाची असेल तर, असा न्यायनिर्णय अशा व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्या जंगम किंवा स्थावर मालमत्तेविरुद्ध अथवा खुद्द त्या व्यक्तीविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध बजावला जाणार नाही, तर सोसायटीच्या मालमत्तेविरुद्ध बजावला जाईल.

अंमलबजावणीसाठी दरखास्त देताना त्यामध्ये, न्यायनिर्णय कोणता आहे, तसेच सोसायटीच्यावतीनेच फक्त ज्या पक्षकाराने किंवा, प्रकरणपरत्वे, ज्या पक्षकाराविरुद्ध दावा लावला असून, ज्याच्याविरुद्ध न्यायनिर्णयाची रक्कम वसूल करावयाची आहे तो पक्षकार कोणता याबाबतची वस्तुस्थिती मांडावी लागेल, आणि असा न्यायनिर्णय सोसायटीच्या मालमत्तेच्याविरुद्ध बजावण्यात यावा अशी मागणी करावी लागेल.

उपविधी अन्वये लागू होणाऱ्या दंडाची वसुली.

९. सोसायटीचे नियम आणि विनियम यांनुसार रीतसर करण्यात आलेल्या कोणत्याही उपविधी-अन्वये अथवा उपविधी करण्यासाठी नियमांमध्ये उपबंध करण्यात आलेला नसल्यास, या प्रयोजनार्थ बोलावलेल्या सोसायटीच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात आलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये (तो करण्यासाठी अशा सभेला उपस्थित सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांची सहमतिसूचक मते आवश्यक असतील) सोसायटीच्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या भंगाबद्दल कोणताही द्रव्यदंड लादण्यात येईल त्या त्या प्रसंगी, असा द्रव्यदंड, तो देय होईल तेव्हा, जेथे प्रतिवादी निवास करीत असेल ते ठिकाण अथवा जेथे सोसायटी वसलेली असेल ते ठिकाण यांपैकी नियामक मंडळास इष्ट वाटेल अशा ठिकाणी अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयात वसूल करता येईल.

**सदस्य हे तिन्हाईत व्यक्ती म्हणून दावा लावला जाण्यास पात्र.**

१०. ज्या सदस्याने सोसायटीच्या नियमांनुसार वर्गणीची रक्कम भरण्यास तो बांधलेला असूनही ती रक्कम थकवली असेल अथवा जो कोणी या नियमांच्या विरुद्ध होईल अशा पद्धतीने किंवा अशा काळापर्यंत सोसायटीची कोणतीही मालमत्ता आपल्याजवळ बाळगील किंवा ती अडकवून ठेवील, अगर सोसायटीच्या कोणत्याही मालमत्तेला क्षती पोचवील किंवा ती नष्ट करील अशा कोणत्याही सदस्याविरुद्ध अशा थकबाकीबद्दल, किंवा अशा प्रकारे मालमत्ता अडकवून ठेवण्यामुळे होणारे तिचे नुकसान, तिची क्षती किंवा तिचा नाश यांबद्दल यात यापूर्वी उपबंध केल्याप्रमाणे दावा दाखल करता येईल :

**न्यायनिर्णीत खर्चाची वसूली.**

परंतु, सोसायटीच्या पुढाकाराने प्रतिवादीविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही दाव्यात जिकलेल्या किंवा अन्य कार्यवाहीमध्ये प्रतिवादी जिकला आणि त्याच्या दावा-खर्चाची त्याने वसुली करण्याबाबत प्रतिवादीकडन न्यायनिर्णय देण्यात आलेला असेल तर, ज्या अधिकाऱ्याच्या नावाने दावा दाखल करण्यात आलेला असेल त्या अधिकाऱ्याकडून किंवा सोसायटीकडून खर्च वसूल करण्याची कार्यवाही करण्याचा पर्याय तो निवडू शकेल व दुसऱ्या पर्यायाच्या बाबतीत, उपर्युक्त पद्धतीने उक्त सोसायटीच्या मालमत्तेविरुद्ध आदेशिका मिळवू शकेल.

**अपराधांबद्दल दोषी असणारे सदस्य तिन्हाईत व्यक्तीं प्रमाणे शिक्षा होण्यास पात्र.**

११. सोसायटीचा जो सदस्य सोसायटीचा कोणताही पैसा किंवा अन्य मालमत्ता चोरील, हडप करील किंवा तिची अफरातफर करील, अथवा सोसायटीची कोणतीही मालमत्ता बुद्धिपुरस्सर आणि दुर्भावपूर्वक नष्ट करील किंवा तिला क्षती पोचवील, अथवा ज्यायोगे सोसायटीच्या पैशांची हानी होऊ शकेल अशा प्रकारे कोणताही विलेख, बंधपत्र, पैशांचा रोखा, पावती अथवा अन्य संलेख बनावट तयार करील असा कोणताही सदस्य हा, अशाच अपराधाच्या संबंधात सदस्य नसलेली कोणतीही व्यक्ती ज्याप्रमाणे खटला भरला जाण्यास आणि दोषसिद्धी झाल्यास शिक्षा मिळण्यास पात्र होईल त्याप्रमाणे खटला भरला जाण्यास आणि शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल.

**[1] कलम ४ क चे उल्लंघन केल्याबद्दल दंड.**

[1][११क. या अधिनियमान्वये नोंदण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आलेल्या नियामक मंडळास, कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन पाठविण्यास फर्मावले असता, उक्त नियामक मंडळ जर—

(एक) कलम ४क अन्वये अपेक्षित असेल अशी माहिती किंवा प्रतिवेदन पाठविण्यात हेतुपुरस्सर नकार देईल, किंवा अशी माहिती किंवा प्रतिवेदन पाठविण्यात कायदेशीर सबबीशिवाय हयगय करील ; अथवा

(दोन) जी माहिती किंवा जे प्रतिवेदन खोटे असल्याचे त्यास माहीत असेल अशी माहिती किंवा प्रतिवेदन हेतुपुरस्सर देईल किंवा देण्याची व्यवस्था करील ; अथवा

(तीन) कलम ४क अन्वये जी माहिती पुरविणे आवश्यक असेल अशी कोणतीही माहिती प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यास नकार देईल किंवा हेतुपुरस्सर खोटे उत्तर देईल,

तर अशा नियामक मंडळाला अशा प्रत्येक अपराधाबद्दल दोषसिद्धीअन्ती, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल.]

**माहिती किंवा प्रतिवेदन अयोग्य रीतीने उघड केल्याबद्दल दंड.**

[1][११ख. निबंधकाने किंवा या अधिनियमाखालील कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदने गोळा करण्याकरिता त्यांच्याकडून रीतसर प्राधिकृत झालेल्या कोणत्याही इसमाने, या अधिनियमान्वये आपल्या कर्तव्यांचे पालन करताना किंवा ह्या अधिनियमाखालील अगर 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखालील कोणत्याही अपराधाबद्दलच्या खटल्याच्या प्रयोजनार्थ नव्हे तर अन्यथा या अधिनियमान्वये देण्यात आलेली कोणतीही माहिती किंवा सादर करण्यात आलेल्या कोणत्याही प्रतिवेदनातील मजकूर हेतुपुरस्सर उघड केला तर, त्याला अशा अपराधाबद्दल दोषसिद्धीअन्ती दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल.]

---

१. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ५ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

आपल्या प्रयोजनांमध्ये परिवर्तन करण्यास, त्यांची व्याप्ती वाढविण्यास किंवा त्यांचा संकोच करण्यास सोसायट्यांना समर्थ करण्याबाबत.

१२. जी सोसायटी कोणत्याही विशिष्ट प्रयोजनाकरता किंवा प्रयोजनांकरता स्थापन करण्यात आली असून या अधिनियमान्वये नोंदलेली आहे अशा कोणत्याही सोसायटीच्या नियामक मंडळाला जेव्हा केव्हा असे प्रयोजन किंवा प्रयोजने या अधिनियमानुसार असलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनांमध्ये परिवर्तित करणे, अशा प्रयोजनांपर्यंत त्यांची व्याप्ती वाढवणे किंवा त्यांचा संकोच करणे अथवा अशी सोसायटी अन्य कोणत्याही सोसायटी-बरोबर पूर्णतः किंवा अंशतः संमिलित करणे इष्ट वाटेल तेव्हा, असे नियामक मंडळ सोसायटीच्या सदस्यांना अशी प्रकारचा प्रस्ताव लिखित अथवा मुद्रित अहवालाच्या स्वरुपात सादर करू शकेल आणि सोसायटीच्या विनियमांनुसार त्यावर विचार करण्याकरता विशेष सभा बोलावू शकेल :

परंतु, नियामक मंडळाने बोलावलेल्या विशेष सभेच्या दहा दिवस आधी असा अहवाल त्याच्यावर विचार करण्याकरिता सोसायटीच्या प्रत्येक सदस्या-कडे पोचवण्यात किंवा टपालाने पाठवण्यात आल्या-खेरीज व तसेच, अशा प्रस्तावास एकूण सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी जातीने किंवा प्रतिव्यक्तीमार्फत आपली अनुकूल मते देऊन तो संमत केला आणि या सभेनंतर एक महिन्याच्या कालांतराने नियामक मंडळाकडून बोलावण्यात आलेल्या दुसऱ्या विशेष सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांच्या मतांनी त्याला पुष्टी देण्यात आली असे घडल्याखेरीज असा कोणताही प्रस्ताव अंमलात आणला जाणार नाही.

[1][ ११ग. कलम ११क खालील अपराधाबद्दलचा खटला निबंधकाशिवाय किंवा त्याच्या मंजुरीशिवाय कोणालाही गुदरता येणार नाही, आणि कलम ११ख खालील अपराधाबद्दलचा खटला राज्य शासनाशिवाय किंवा त्याच्या संमतीशिवाय कोणालाही गुदरता येणार नाही. ]

अपराधांची दखल घेणे.

१२. जी सोसायटी कोणत्याही विशिष्ट प्रयोजनाकरता किंवा प्रयोजनांकरता स्थापन करण्यात आली असून या अधिनियमान्वये नोंदलेली आहे अशा कोणत्याही सोसायटीच्या नियामक मंडळाला जेव्हा केव्हा असे प्रयोजन किंवा प्रयोजने या अधिनियमानुसार असलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनांमध्ये परिवर्तित करणे, अशा प्रयोजनांपर्यंत त्यांची व्याप्ती वाढवणे किंवा त्यांचा संकोच करणे, अथवा अशी सोसायटी अन्य कोणत्याही सोसायटी-बरोबर पूर्णतः किंवा अंशतः संमिलित करणे इष्ट वाटेल तेव्हा, [2][ अथवा या अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या कोणत्याही सोसायटीची नियामक मंडळ जेव्हा केव्हा सोसायटीचे नाव बदलण्याचे ठरवील तेव्हा, ] असे नियामक मंडळ, सोसायटीच्या सदस्यांना अशा प्रकारचा प्रस्ताव लिखित अथवा मुद्रित अहवालाच्या स्वरुपात सादर करू शकेल आणि सोसायटीच्या विनियमांनुसार त्यावर विचार करण्याकरता विशेष सभा बोलावू शकेल :

परंतु, नियामक मंडळाने बोलावलेल्या विशेष सभेच्या दहा दिवस आधी असा अहवाल त्याच्यावर विचार करण्याकरिता सोसायटीच्या प्रत्येक सदस्यांकडे पोचवण्यात किंवा टपालाने पाठवण्यात आल्याखेरीज व तसेच, अशा प्रस्तावास एकूण सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी जातीने किंवा प्रतिव्यक्ती-मार्फत आपली अनुकूल मते देऊन तो संमत केला आणि या सभेनंतर एक महिन्याच्या कालांतराने नियामक मंडळाकडून बोलावण्यात आलेल्या दुसऱ्या विशेष सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांच्या मतांनी त्याला पुष्टी देण्यात आली असे घडल्याखेरीज असा कोणताही प्रस्ताव अंमलात आणला जाणार नाही.

[3][ १२क. (१) नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव कलम १२ द्वारे विहित करण्यात आलेल्या रीतीने संमत करण्यात येऊन त्याला पुष्टी देण्यात आली असेल अशा बाबतीत, अशाप्रकारे संमत करण्यात आलेल्या आणि पुष्टी देण्यात आलेल्या प्रस्तावाची एक प्रत [4]* * * निबंधकाकडे, नावातील बदलाची नोंदणी करण्यासाठी पाठवण्यात येईल. [5][ जर नावातील प्रस्तावित बदल हा कलम ३क मध्ये नमूद केलेल्यांपैकी कोणत्याही कारणास्तव आपल्या मते अवांछनीय असेल तर ], निबंधक नावातील बदलाची नोंदणी करण्याचे नाकारील.

नावातील बदलाची नोंदणी.

१. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ५ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

२. १९४८ चा मुंबई अधिनियम ५३, कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

३. कित्ता—कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

४. १९५६ चा मुंबई अधिनियम ११, कलम ४ द्वारे " कंपनी " हा शब्द गाळला.

५. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) पोटकलम (१) मध्ये उपबंध करण्यात आल्याप्रमाणे असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, जर नावातील बदलाच्यासंबंधी या अधिनियमात असलेल्या उपबंधांचे पालन करण्यात आले आहे याबाबत निबंधकाचे समाधान झाले तर, तो नावातील बदलाची नोंदणी करील आणि त्या प्रकरणाच्या परिस्थितीनुरूप फेरबदल केलेले नोंदणी प्रमाणपत्र देईल. असे प्रमाणपत्र देण्यात आल्यावर नावातील बदलाची कार्यवाही पूर्ण होईल.

(३) पोटकलम (२) खाली दिलेल्या प्रमाणपत्राच्या कोणत्याही प्रतीबद्दल निबंधक एक रुपया फी आकारील आणि अशाप्रकारे भरण्यात आलेल्या सर्व फीचा हिशेब [1][राज्य] शासनाकडे देण्यात येईल.]

[2][(४) जर (कलम ३क चे उपबंध योग्यप्रकारे लक्षात घेता) एखादी सोसायटी ज्या नावाने नोंदली जायला नको होती अशा नावाने अनवधानाने, किंवा अन्यथा नोंदली गेली असेल तर, निबंधक नाव बदलण्याचा निदेश देऊ शकेल ; आणि त्या सोसायटीला या अधिनियमाच्या उपबंधांनुसार ती संबंधित पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर सोसायटीला निदेश देण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीत किंवा आणखी मुदत देणे निबंधकाला योग्य वाटल्यास अशा वाढीव मुदतीत आपले नाव बदलावे लागेल.]

[3][१२ख. सोसायटीच्या नावातील बदलामुळे, सोसायटीच्या कोणत्याही हक्कांवर किंवा दायित्वांवर परिणाम होणार नाही अथवा त्यामुळे सोसायटीने किंवा सोसायटीविरुद्ध केलेली कोणतीही वैध कार्यवाही सदोष ठरणार नाही ; आणि सोसायटीकडून किंवा तिच्याविरुद्ध जुन्या नावाने जी कोणतीही वैध कार्यवाही चालू ठेवता आली असती किंवा सुरू करता आली असती ती कार्यवाही तिच्या नवीन नावाने चालू ठेवता येईल किंवा सुरू करता येईल.] नावातील बदलाचा परिणाम.

[3][१२ग. या अधिनियमाखाली नोंदलेल्या कोणत्याही सोसायटीने, जर 'सोसायटी नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४८' (१९४८ चा मुंबई ५३) अंमलात येण्यापूर्वी कंपनी निबंधकाला आपल्या नावातील बदल कळविला असेल आणि जर निबंधकाने असा बदल नोंदलेला असेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, निबंधक त्या सोसायटीने याबाबत अर्ज केल्यानंतर आणि कलम १२क च्या पोटकलम (३) मध्ये उपबंध करण्यात आल्याप्रमाणे फी भरल्यानंतर, निबंधक अशा नावातील बदलाची नोंदणी करू शकेल आणि उक्त कलम १२क च्या पोटकलम (२) अन्वये त्या सोसायटीला प्रमाणपत्र देऊ शकेल. असे प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर, निबंधकाने असा बदल नोंदला असेल त्या तारखेपासून असा बदल पूर्ण झाल्याचे मानण्यात येईल—मग कलमे १२ आणि १२क मध्ये विहित केलेली कार्यपद्धती त्या सोसायटीने अनुसरली नव्हती अशी वस्तुस्थिती असली तरी हरकत नाही.] सन १९४८ चा मुंबई अधिनियम ५३ हा अंमलात येण्यापूर्वी केलेल्या नाव बदलांची नोंदणी.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ शब्दाऐवजी दाखल केले.

२. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम १११—कलम ६ द्वारे जादा दाखल केले.

३. १९४८ चा मुंबई अधिनियम ५३१—कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

[1][१२घ. (१) या अधिनियमान्वये नोंदण्यात आलेल्या ('मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०' (१९५० चा मुंबई २९) याच्या अर्थानुसार सार्वजनिक न्यास नसलेल्या) सोसायटीच्या कामकाजाची व्यवस्था ज्याच्याकडे सोपविण्यात आलेली आहे अशा प्रत्येक नियामक मंडळाला रीतसर हिशेब ठेवावे लागतील.

**हिशेब ठेवणे आणि त्यांचे संतुलन व लेखापरीक्षा.**

(२) असे हिशेब निबंधक मान्यता देईल अशा नमुन्यात ठेवावे लागतील आणि त्यात नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा तपशील असेल.

(३) दरवर्षी, मार्चच्या एकतीस तारखेस किंवा निबंधकाकडून निश्चित करण्यात येईल अशा अन्य दिवशी हिशेबांचे संतुलन करावे लागेल.

(४) नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, दरवर्षी आणि 'सनदी लेखाकार अधिनियम १९४९' (१९४९ चा ३८) याच्या अर्थानुसार जो सनदी लेखाकार असेल अशा इसमाकडून किंवा राज्य शासन या बाबतीत प्राधिकृत करील अशा इतर इसमांकडून हिशेबांची लेखापरीक्षा करण्यात येईल.]

[1][१२ङ. (१) कलम १२घ अन्वये सोसायटीच्या हिशेबांची लेखापरीक्षा करणाऱ्या प्रत्येक लेखापरीक्षकाने ताळेबंद आणि उत्पन्न व खर्च यांचा हिशेब तयार करून त्याची एक प्रत निबंधकाकडे अग्रेषित करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

**ताळेबंद तयार करणे व गैरनियम गोष्टी इत्यादी कळवणे हे लेखापरीक्षकाचे कर्तव्य.**

(२) गैरनियम, अवैध किंवा अनुचित खर्चाची अथवा संस्थेचे पैसे किंवा इतर मालमत्ता वसूल करण्यास चुकल्याची किंवा त्यात कसूर झाल्याची अथवा सोसायटीच्या पैशांची किंवा इतर मालमत्तेची झालेली हानी किंवा अपव्ययाबद्दलची सर्व प्रकरणे लेखापरीक्षक आपल्या अहवालात विनिर्दिष्ट करील ; आणि असा खर्च चूक, कसूर, हानी किंवा अपव्यय हा नियामक मंडळाने किंवा इतर कोणत्याही इसमाने न्यासभंग केल्यामुळे किंवा दुरुपयोजन केल्यामुळे किंवा इतर कोणत्याही गैरवर्तणुकीमुळे झालेला आहे किंवा कसे ते नमूद करील.]

**सोसायट्यांचे विसर्जन करणे आणि त्यांचा कारभार निस्तरणे यांसाठी उपबंध.**

१३. कोणत्याही सोसायटीच्या किमान तीन-पंचमांश इतक्या सदस्यांना ती सोसायटी विसर्जित करण्याचे ठरवता येईल, आणि त्यानंतर, ती तत्काळ किंवा त्यावेळी संमत झालेल्या वेळी विसर्जित करण्यात येईल, आणि या संबंधात लागू होणारे असे सदर सोसायटीचे काही नियम असल्यास त्यानुसार आणि असे नियम नसल्यास, नियामक मंडळाला समयोचित वाटेल त्याप्रमाणे, सोसायटीच्या मालमत्तेची विल्हेवाट करण्यासाठी आणि तिच्या हक्कमागण्या व दायित्वे चुकती होण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येईल ; परंतु उक्त नियामक मंडळाच्या सदस्यांमध्ये किंवा सोसायटीच्या सदस्यांमध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास, तिचा कारभार निस्तरण्यासंबंधीचा प्रश्न सोसायटीची मुख्य इमारत ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या मूळ दिवाणी अधिकारितेच्या प्रधान न्यायालयाकडे निर्णयार्थ निर्देशित करावा लागेल, आणि न्यायालय अशा बाबतीत त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे आदेश देईल :

**संमती आवश्यक.**

परंतु, सोसायटी विसर्जित करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये तीन पंचमांश इतक्या सदस्यांनी जातीने किंवा प्रतिव्यक्तीमार्फत मतदान करून त्याद्वारे, असे विसर्जन करण्याची आपली इच्छा व्यक्त केल्याशिवाय अशी कोणतीही सोसायटी विसर्जित करता येणार नाही :

**सरकारची संमती.**

परंतु, [1][जेव्हाकेव्हा कोणतेही सरकार] या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही सोसायटीचे सदस्य किंवा अंशदाता असेल किंवा तिच्यात ते अन्यप्रकारे हितसंबंधित असेल तेव्हां, [2][जेथे नोंदणी झाली त्या राज्याच्या सरकारच्या संमतीशिवाय] अशी सोसायटी विसर्जित करता येणार नाही.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "जेव्हाकेव्हा सरकार" या मजकुराऐवजी घातले.

२. कित्ता--द्वारे "सरकारच्या संमतीशिवाय" या मजकुराऐवजी घातले.

१. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ७ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

*१४. या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेली कोणतीही सोसायटी विसर्जित होऊन तिची सर्व ऋणे आणि दायित्वे चुकती करण्यात आल्यानंतर जर तिची काही मालमत्ता—मग ती कोणत्याही स्वरूपाची असो—शिल्लक राहिली तर, ती उक्त सोसायटीच्या सर्व किंवा कोणत्याही सदस्यांना देता किंवा त्यांच्यात वाटून देता येणार नाही, तर विसर्जनाच्या वेळी व्यक्तीशः किंवा प्रतिव्यक्तीमार्फत उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी किमान तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी मतदानाद्वारे किंवा त्याअभावी पूर्वोक्त अशा न्यायालयाने ठरावयाच्या अशा अन्य सोसायटीला ती द्यावी लागेल : विसर्जनानंतर कोणत्याही सदस्याला नफा न मिळणे.

परंतु, असे असले तरी, भागधारकांच्या अंशदानाद्वारे संयुक्त भांडवल कंपनीच्या स्वरूपात जी सोसायटी प्रतिष्ठापित किंवा स्थापन करण्यात आलेली असेल अशा कोणत्याही सोसायटीला हा खंड लागू होणार नाही. संयुक्त भांडवल कंपन्याना हा खंड लागू नाही.

१५. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सोसायटीचा सदस्य म्हणजे ज्या व्यक्तीला सोसायटीचे नियम व विनियम यांनुसार प्रवेश देण्यात आलेला असून, जिने सोसायटीची वर्गणी भरलेली असेल अथवा सदस्यांच्या पटावर किंवा यादीवर सही केलेली असेल व तसेच जिने अद्याप सोसायटीचे नियम व विनियम यांनुसार राजीनामा दिलेला नसेल अशी व्यक्ती होय; पण ज्या व्यक्तीच्या वर्गणीची बाकी तीन महिन्यांहून अधिक काळ थकली असेल ती व्यक्ती या अधिनियमाखालील सर्व कामकाजामध्ये मतदान करण्यास किंवा सदस्य म्हणून गणली जाण्यास हक्कदार असणार नाही. 'सदस्य' याची व्याख्या. निरर्ह सदस्य.

१६. नियामक मंडळ म्हणजे नियामक, परिषद, संचालक, समिती, विश्वस्त किंवा ज्याच्याकडे सोसायटीचे नियम व विनियम यांनुसार सोसायटीच्या कारभाराच्या व्यवस्थापनाचे काम सोपवले असेल असा अन्य निकाय होय. 'नियामक मंडळ' याची व्याख्या.

१७. साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी स्थापन केलेली आणि †१८५० चा अधिनियम ४३ याअन्वये नोंदणी केलेली कोणतीही कंपनी किंवा सोसायटी अथवा हा अधिनियम संमत होण्यापूर्वी स्थापन व घटित केलेली, पण सदर १८५० चा अधिनियम ४३ याअन्वये नोंदणी न केलेली अशी कोणतीही सोसायटी यानंतर केव्हाही या अधिनियमाखाली नोंदली जाऊ शकेल; परंतु अट अशी की, नियामक मंडळाने या प्रयोजनार्थ बोलावलेल्या एखाद्या सर्वसाधारण सभेमध्ये जातीने किंवा प्रतिव्यक्तीमार्फत उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी अशाप्रकारे नोंदणी केली जाण्यास आपली संमती दिल्याखेरीज अशी कोणतीही कंपनी किंवा सोसायटी या अधिनियमाखाली नोंदली जाणार नाही.

१७. साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी स्थापन केलेली आणि १८५० चा अधिनियम ४३ याअन्वये नोंदणी केलेली कोणतीही कंपनी किंवा सोसायटी अथवा [1][या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी राज्याच्या संबंधित भागात स्थापन व घटित केलेली, पण सदर १८५० चा अधिनियम ४३ याअन्वये किंवा अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी सोसायट्यांच्या किंवा कंपन्यांच्या नोंदणीसाठी असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये] नोंदणी न केलेली अशी कोणतीही सोसायटी यानंतर केव्हाही या अधिनियमाखाली नोंदली जाऊ शकेल; परंतु अट अशी की, नियामक मंडळाने या प्रयोजनार्थ बोलावलेल्या एखाद्या सर्वसाधारण सभेमध्ये जातीने किंवा प्रतिव्यक्तीमार्फत उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी अशाप्रकारे नोंदणी केली जाण्यास आपली संमती दिल्याखेरीज अशी कोणतीही कंपनी किंवा सोसायटी या अधिनियमाखाली नोंदली जाणार नाही. अधिनियमापूर्वी बनवण्यात आलेल्या सोसायट्यांची नोंदणी. संमती आवश्यक.

---

*सन १९१२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याचे कलम १ पुढीलप्रमाणे आहे :—

'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' (याला यात यापुढे "उक्त अधिनियम" असे म्हटले आहे) याच्या कलम १४ मध्ये काहीही असले तरी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये विसर्जित झालेल्या कोणत्याही सोसायटीच्या सदस्यांनी, अशा सोसायटीच्या विसर्जनाच्या वेळी जातीने किंवा प्रतिव्यक्तीमार्फत हजर असलेल्या सदस्यांच्या बहुमताने, सर्व ऋणे व दायित्वे चुकती करण्यात आल्यानंतर शिल्लक राहणारी कोणतीही मालमत्ता, उक्त अधिनियमाच्या कलम १ मध्ये उल्लेख केलेल्यांपैकी कोणत्याही कारणाकरिता वापरण्यासाठी सरकारला देण्यात यावी असे ठरविणे कायदेशीर असेल.

† भारतीय कंपनी अधिनियम, १८६६ (१८६६ चा १०), कलम २१९ व अनुसूची तीन यांद्वारे निरसित. आता 'कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १)' पहा.

१. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला.

†१८५० चा अधिनियम ४३ याअन्वये नोंदणी केलेल्या कंपनीच्या किंवा सोसायटीच्या बाबतीत, संचालक हेच नियामक मंडळ म्हणून मानण्यात येईल.

अशा प्रकारे नोंदणी न केलेल्या सोसायटीच्या बाबतीत, सोसायटीच्या स्थापनेनंतर असे नियामक मंडळ घटित करण्यात आलेले नसेल तर, तिच्या सदस्यांनी रीतसर नोटीस देऊन इत:पर सोसायटीचे काम करण्याकरता एक नियामक मंडळ निर्माण करणे कायदेशीर ठरेल.

अशा सोसायट्यांनी समयलेख, इत्यादी निबंधक, संयुक्त भांडवल कंपन्या यांच्याकडे दाखल करणे.

१८. मागील कलमात उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही सोसायटीला या अधिनियमाखाली नोंदणी करवून घेण्यासाठी सोसायटीच्या नियामक मंडळाने सोसायटीचे नाव, तिची उद्दिष्टे, नियामक मंडळाच्या सदस्यांची नावे, पत्ते आणि व्यवसाय दर्शविणारा एक समयलेख आणि सोबत कलम २ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे सोसायटीचे नियम व विनियम यांची एक प्रमाणित प्रत व ज्या सर्वसाधारण सभेत सोसायटीची नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला तिच्या कामकाजवृत्ताची एक प्रत ही कागदपत्रे [१]* * * निबंधक, संयुक्त भांडवल कंपन्या यांच्याकडे दाखल केले तरी पुरेसे होईल.

दस्तऐवजांचे निरीक्षण.

१९. कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये निबंधकाकडे दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजांचे निरीक्षण करावयाचे असल्यास, अशा प्रत्येक निरीक्षणाच्या वेळी एकेक रुपया फी देऊन ते पाहू शकेल; आणि कोणतीही व्यक्ती कोणत्याही दस्तऐवजाची एखादी प्रत किंवा त्यातील उतारा किंवा कोणत्याही दस्तऐवजाचा कोणताही भाग निबंधकाकडून प्रमाणित करवून मिळण्याची मागणी करू शकेल व अशा प्रमाणित प्रतीमधील किंवा उताऱ्यामधील दर शंभर शब्दांमागे दोन आणे शुल्क द्यावे लागेल आणि अशी प्रमाणित प्रत कोणत्याही स्वरूपाच्या वैध कार्यवाहीत अंतर्भूत असलेल्या बाबींचा प्रथमदर्शनी पुरावा असेल.

प्रमाणित प्रती.

कोणकोणत्या सोसायट्यांना हा अधिनियम लागू होता.

२०. या अधिनियमान्वये पुढील प्रकारच्या सोसायट्यांची नोंदणी होऊ शकेल, त्या म्हणजे:—

धर्मादाय सोसायट्या, भारताच्या विविध इलाख्यांमध्ये स्थापन करण्यात आलेले सैनिकी अनाथ बालक निधी किंवा सोसायट्या, तसेच विज्ञान, साहित्य किंवा ललितकला यांच्या अभिवृद्धीसाठी, शिक्षण, उपयुक्त ज्ञानाचा प्रसार, [२][राजकीय शिक्षणाचा प्रसार] यांसाठी आणि सदस्यांच्या सार्वजनिक उपयोगाकरता किंवा आम

†'भारतीय कंपनी अधिनियम, १८६६' (१८६६ चा १०), कलम २१९ व अनुसूची तीन यांद्वारे निरसित. आता, 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) पहा.

१. १८७४ चा अधिनियम १६, कलम १ व अनुसूची, भाग एक द्वारे "१८५७ चा अधिनियम १९ याखाली" हा मजकूर गाळला. आता, 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) पहा.

२. १९२७ चा अधिनियम २२, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

१८५० चा अधिनियम ४३ याअन्वये नोंदणी केलेल्या कंपनीच्या किंवा सोसायटीच्या बाबतीत, संचालक हेच नियामक मंडळ म्हणून मानण्यात येईल.

अशा प्रकारे नोंदणी न केलेल्या सोसायटीच्या बाबतीत, सोसायटीच्या स्थापनेनंतर असे नियामक मंडळ घटित करण्यात आलेले नसेल तर, तिच्या सदस्यांनी रीतसर नोटीस देऊन इत:पर सोसायटीचे काम करण्याकरता एक नियामक मंडळ निर्माण करणे कायदेशीर ठरेल.

१८. मागील कलमात उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही सोसायटीला या अधिनियमाखाली नोंदणी करवून घेण्यासाठी सोसायटीच्या नियामक मंडळाने सोसायटीचे नाव, तिची उद्दिष्टे, नियामक मंडळाच्या सदस्यांची नावे, पत्ते आणि व्यवसाय दर्शविणारा एक समयलेख आणि सोबत कलम २ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे सोसायटीचे नियम विनियम व यांची एक प्रमाणित प्रत व ज्या सर्वसाधारण सभेत सोसायटीची नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला, तिच्या कामकाजवृत्तांची एक प्रत ही कागदपत्रे निबंधक[१] ** यांच्याकडे दाखल केले तरी पुरेसे होईल.

अशा सोसायट्यांनी समय-लेख, इत्यादी निबंधक [१]* * * यांच्याकडे दाखल करणे.

१९. [२][कलम ४क द्वारे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही,] कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये निबंधकाकडे दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजांचे निरीक्षण करावयाचे असल्यास, अशा प्रत्येक निरीक्षणाच्या वेळी एकेक रुपया फी देऊन ते पाहू शकेल; [३][अथवा राज्य शासन किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी यासंबंधात शासकिय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित करील अशी फी भरल्यावर आपणांस कोणत्याही दस्तऐवजाची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची प्रमाणित प्रत किंवा त्यातील उतारा देण्यात यावा अशी निबंधकाकडे मागणी करू शकेल] आणि अशी प्रमाणित प्रत कोणत्याही स्वरूपाच्या वैध कार्यवाहीत अंतर्भूत असलेल्या बाबींचा प्रथमदर्शनी पुरावा असेल.

दस्तऐवजांचे निरीक्षण.

२०. [४][(१)] या अधिनियमान्वये पुढील प्रकारच्या सोसायट्यांची नोंदणी होऊ शकेल, त्या म्हणजे :—

कोणकोणत्या सोसायट्यांना हा अधिनियम लागू होता.

धर्मादाय सोसायट्या, भारताच्या विविध इलाख्यांमध्ये स्थापन करण्यात आलेले सैनिकी अनाथ बालक निधी किंवा सोसायट्या, तसेच विज्ञान, साहित्य किंवा ललित कला यांच्या अभिवृद्धीसाठी, शिक्षण, उपयुक्त ज्ञानाचा प्रसार, राजकीय शिक्षणाचा प्रसार यासाठी आणि

१. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम ५ द्वारे "संयुक्त भांडवल कंपन्या" हे शब्द गाळले.

२. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ८ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

३. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला.

४. किता—कलम ७ द्वारे कलम २० ला त्या कलमाचे पोटकलम (१) म्हणून नवीन क्रमांक दिला व पोटकलम (२) जादा दाखल केले.

जनतेला खुली असलेली ग्रंथालये किंवा वाचनालये स्थापन करणे आणि चालवणे यांसाठी अथवा सार्वजनिक वस्तुसंग्रहालये, रंगचित्रे व इतर कलाकृती यांच्या चित्रवीथी (गॅलऱ्या), निसर्गेतिहासिक वस्तुसंग्रह, यंत्रशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानविषयक नवशोध, संलेख किंवा रचनाकृती यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या सोसायट्या.

सदस्यांच्या सार्वत्रिक उपयोगाकरता किंवा आम जनतेला खुली असलेली ग्रंथालये किंवा वाचनालये स्थापन करणे आणि चालवणे यांसाठी अथवा सार्वजनिक वस्तुसंग्रहालये, रंगचित्रे व इतर कलाकृती यांच्या चित्रवीथी (गॅलऱ्या), निसर्गेतिहासिक वस्तुसंग्रह, यंत्रशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानविषयक नवशोध, संलेख किंवा रचनाकृती यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या सोसायट्या.

[1][ (२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही सार्वजनिक किंवा धार्मिक प्रयोजनार्थ 'सार्वजनिक सोसायटी नोंदणी अधिनियम' (१३५० फसली चा हैद्राबाद अधिनियम १) याखाली नोंदणी झालेली आणि 'सोसायटी नोंदणी (मुंबई विस्तारण व सुधारणा) अधिनियम, १९५८' (१९५८ चा मुंबई अधिनियम ७५) याच्या प्रारंभाच्यावेळी *मुंबई राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रात कार्यरत असलेली कोणतीही सोसायटी ही या अधिनियमाखाली नोंदली असल्याचे व ती नोंदणी चालू असल्याचे मानले जाईल. ]

**"विशेष सोसायटी" याची व्याख्या.**

[2][ २०क. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ "विशेष सोसायटी" म्हणजे 'महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१' (१९७१ चा महाराष्ट्र ४९) याच्या प्रयोजनांसाठी स्थापन केलेली सोसायटी होय. ]

**विशेष सोसायट्यांच्या बाबतीत अधिनियमात फेरबदल करण्याचा अधिकार.**

[2][ २०ख. (१) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या या अधिनियमाच्या उपबंधांपैकी काही उपबंध,—

(क) विशेष सोसायटीला लागू होणार नाहीत; किंवा

(ख) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अपवाद, फेरबदल आणि अनुकूलने यांसह ते विशेष सोसायटीला लागू होतील;

(२) पोटकलम (१) अन्वये काढण्यात येलेल्या प्रत्येक अधिसूचनेची एकेक प्रत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू असताना, कमीत कमी तीस दिवस इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मसुद्याच्या स्वरूपात ठेवण्यात येईल, आणि त्या मुदतीत जर दोहोंपैकी एखाद्या सभागृहाने अधिसूचना काढण्यास मान्यता दिली नाही किंवा फेरबदल करूनच ती काढण्यास मान्यता दिली तर, एकतर

---

१. १९५८ चा मुंबई अधिनियम ७६, कलम ७ द्वारे कलम २० ला त्या कलमाचे पोटकलम (१) म्हणून नवीन क्रमांक देऊन पोटकलम (२) जादा दाखल केले.

२. १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४९, कलम १७ द्वारे सदर कलमे २१ वे व २२ वे कलम म्हणून समाविष्ट केली व १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे उपरोक्त कलमांना पूर्वी दिलेल्या २१ व २२ या क्रमांकाऐवजी २०क व २०ख हे नवीन क्रमांक देण्यात आले.

* 'मुंबई राज्य' हा शब्दोल्लेख कायम राहील. अनुकूलन आदेश, १९६० पहा.

अशी अधिसूचना मुळीच काढण्यात येणार नाही किंवा, प्रकरणपरत्वे, आवश्यक असेल त्याप्रमाणे, दोन्ही सभागृहांना मान्य होतील अशा फेरबदलांसह अशी अधिसूचना काढण्यात येईल.]

१ मे १९५७ पूर्वी कच्छ, मध्य प्रदेश किंवा मुंबई राज्यातील सौराष्ट्र क्षेत्र यांमध्ये प्रलंबित असलेल्या कार्यवाही आणि काढलेल्या किंवा केलेल्या संलेखातील कंपनी निबंधकाच्या निर्देशांचा अन्वयार्थ.

[1][२१. (१) हा अधिनियम कच्छ, मध्य प्रदेश आणि *मुंबई राज्यातील सौराष्ट्र क्षेत्र याला लागू असताना, दिनांक १ मे १९५७ च्या लगतपूर्वी कंपनी निबंधकापुढे प्रलंबित असलेल्या या अधिनियमाखालील सर्व कार्यवाही सोसायटी निबंधकाकडे हस्तांतरित होतील आणि अशी कोणतीही कार्यवाही ही मुळातच आपणांसमोर दाखल करण्यात आली होती असे समजून निबंधक ती पुढे चालू ठेवील व निकालात काढील.

(२) १ मे १९५७ पूर्वी या अधिनियमान्वये दिलेल्या सर्व नोंदणी प्रमाणपत्रात आणि केलेल्या सोसायटीच्या सर्व नियमांत किंवा उपविधींत आणि इतर संलेखांत 'निबंधक, संयुक्त भांडवल कंपन्या' किंवा 'कंपनी निबंधक' यांचे जे निर्देश असतील ते सर्व सोसायटी निबंधकाचे निर्देश असल्याचे मानण्यात येईल व त्याप्रमाणे त्यांचा अन्वयार्थ लावण्यात येईल.]

नियम.

[2][२२. (१) राज्य सरकारास, ह्या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्याकरता, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीनतेने, नियम करता येतील.

(२) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एका अधिवेशनाने किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, अशा निर्णयाची अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून, तो नियम केवळ अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल, किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, असा फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

१. 'सोसायटी नोंदणी अधिनियम (मुंबई अनुकूलन) आदेश, १९५७' च्या अनुसूचीद्वारे समाविष्ट केले.

२. १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ९ द्वारे कलम २२ जादा दाखल केले.

*'मुंबई राज्य' हा शब्दोल्लेख कायम राहील. अनुकूलन आदेश, १९६० पहा.

# सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०

# THE SOCIETIES REGISTRATION ACT, 1860

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अंमलबजावणीसाठी दरखास्त | application for execution | [क. ८-परि. २] |
| अध्यक्ष | president | [क. ६-परंतुक] |
| अवसान पावणे | abate | [क. ७-स.टी.] |
| उपविधि | bye-law | [क. ९] |
| कारभार निस्तरणे | adjustment of affairs | [क. १३] |
| कार्याध्यक्ष | chairman | [क. ६-परंतुक] |
| नामाभिधान | title | [क. ५] |
| निबंधक | registrar | [क. १] |
| न्यायनिर्णयाची बजावणी | enforcement of judgement | [क. ८-स.टी.] |
| न्यायनिर्णीत रक्कम वसूल करणे. | recover a judgment | [क. ८-परि. १] |
| प्रतिव्यक्तीमार्फत | by proxy | [क. १२-परि. २] |
| मुख्य कार्यवाही | principal secretary | [क. ६-परंतुक] |
| रचनाकृती | design | [क. २०] |
| संयुक्त भांडवल कंपनी | joint stock company | [क. १] |
| संलेख | instrument | [क. २०] |
| संस्थापन-समयलेख | memorandum of association | [क. २-स.टी.] |
| समयलेख | memorandum | [क. १८] |
| सहमतिसूचक मते | concurrent votes | [क. ९] |
| हडप करणे | purloin | [क. ११] |

# THE SOCIETIES REGISTRATION ACT, 1860

## सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | | |
|---|---|---|---|
| abate | अवसान पावणे | .. | [S. 7-m.n.] |
| adjustment of affairs | कारभार निस्तरणे | .. | [S. 13] |
| application for execution | अंमलबजावणीसाठी दरखास्त | .. | [S. 8-para. 2] |
| bye-law | उपविधि | .. | [S. 9] |
| by proxy | प्रतिव्यक्तीमार्फत | .. | [S. 12-para. 2] |
| chairman | कार्याध्यक्ष | .. | [S. 6-proviso] |
| concurrent votes | सहमतिसूचक मते | .. | [S. 9] |
| design | रचनाकृती | .. | [S. 20] |
| enforcement of judgment | न्यायनिर्णयाची बजावणी | .. | [S. 8-m.n] |
| instrument | संलेख | .. | [S. 20] |
| joint-stock company | संयुक्त भांडवल कंपनी | .. | [S. 1] |
| memorandum | समयलेख | .. | [S. 18] |
| memorandum of association | संस्थापन-समयलेख | .. | [S. 2-m.n.] |
| president | अध्यक्ष | .. | [S. 6-proviso] |
| principal secretery | मुख्य कार्यवाह | .. | [S. 6-proviso] |
| purloin | हडप करणे | .. | [S. 11] |
| recover a judgment | न्यायनिर्णीत रक्कम वसूल करणे | .. | [S. 8-para. 1] |
| registrar | निबंधक | .. | [S. 1] |
| title | नामाभिधान | .. | [S.5] |

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई